लोकमत

## चातगाव येथील सर्चचा उपक्रम : २७ डिसेंबर ते ७ मार्चपर्यंत चालणार शिबिर

# 'निर्माण'साठी २२७ युवांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडचिरोली :** सर्च संस्थेचे संस्थापक व संचालक डॉ. अभय व डॉ. राणी बंग यांनी २००६ पासून युवा निर्मितीसाठी सुरु केलेल्या 'निर्माण' उपक्रमाच्या दहाव्या सत्रास लवकरच सुरुवात झाली आहे. देशभरातील २२७ युवांची शिबिरासाठी निवड झाली आहे. यामध्ये १२२ युवती आणि १०५ युवकांचा सहभाग आहे. तब्बल एक हजार अर्जांमधून ही निवड करण्यात आली आहे.

### प्रथमच 'निर्माण एक्स' प्रयोग

◆ प्रत्येकाची काम करण्याची आवड, पद्धती आणि कल वेगळा असतो. निर्माण निवड प्रकियेदरम्यान ही बाब नेहमीच प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे अशा युवांना लक्षात घेत त्यांच्यासाठी निर्माण एक्स नावाने वेगळा कृतीकार्यक्रम तयार करण्याचा प्रयोग प्रथमच दशकपूर्तीच्या निमित्ताने केला जाणार आहे.



निवड प्रक्रियेला उपस्थित निर्माण शिबिरार्थी.

आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी व्हावा अशी इच्छा असणाऱ्या युवांना ओळखून त्यांना संघटीत व मार्गदर्शन करण्यासाठी निर्माण ही शौक्षणिक प्रक्रिया सुरु करण्यात आली. युवांना त्यांची कौशल्ये व सामाजिक आव्हानांची सांगड घालून समृद्ध व समाधानी जीवन जगण्यास प्रवृत्त करणे हे निर्माण प्रक्रियेचे ध्येय आहे. सर्च येथे होणाऱ्या या शिबिरांदरम्यान स्वत:ची ओळख, आजूबाजूच्या समाज व निसर्गाची ओळख, समाजातील विविध प्रश्न व त्या सोडवण्याच्या वेगवेगळ्या पद्धती, प्रत्यक्ष सामाजिक काम करणाऱ्या वेगवेगळ्या लोकांसोबत चर्चा अशा टप्प्यांमधून जाताना 'मी जीवनात काय करु' या निर्णयापर्यंत शिबिरार्थी येतात. २०१८-१९ पर्यंत निर्माणच्या ९ बॅचेस पार पडल्या असून महाराष्ट्रासह देशभरात विविध शैक्षणिक पार्श्वभूमीचे १२०० निर्माणी पसरलेले आहेत. त्यांच्यापैकी सुमारे ३५० जण कुठल्या ना कुठला सामाजिक प्रश्नावर काम करीत आहेत.

यावर्षीच्या निर्माणचे दहावे सत्र लवकरच सुरु होत आहे. या सत्रासाठीच्या निवड प्रक्रियेत तब्बल १ हजार अर्ज निर्माणकडे आले होते. विविध पातळ्यांवर घेतलेल्या मुलाखतींमधून निर्माणच्या दहाव्या सत्रासाठी २२७ युवांची निवड करण्यात आले आहे.

यामध्ये मराठवाड्यातील २९, उत्तर महाराष्ट्रातील ३०, पश्चिम महाराष्ट्रातील २८, पूर्व विदर्भातील ३२, पश्चिम विदर्भातील ३०, मुंबईतील २५, पुण्यातील १५, कोकणातील १ याचबरोबर विविध राज्यातील युवांचा समावेश आहे. निवड झालेल्या २२७ युवांना तीन शिबिरात विभागण्यात आले आहे. या सत्रातील पहिले शिबीर २७ डिसेंबर २०१९ ते ४ जानेवारी २०२० दरम्यान, दुसरे शिबीर ८ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत तर तिसरे शिबीर २९ फेब्रुवारी ते ७ मार्च या कालावधीत होत आहे.

Hello Gadchiroli
Page No. 4 Nov 13, 2019
Powered by: erelego.com

# देशातील २२७ युवा करणार 'निर्माण दशकपूर्ती'

## शिबीर दहाव्या सत्रास प्रारंभ : १ हजार अर्जांमधून झाली निवड



तब्बल १ हजार अर्ज निर्माणकडे आले होते. विविध पातळ्यांवर घेतलेल्या मुलाखतींमधून निर्माणच्या दहाव्या सत्रासाठी २२७ युवांची निवड

**प्रतिनिधी / १२ नोव्हेंबर**

**गडचिरोली :** सर्च संस्थेचे संस्थापक व संचालक पद्मश्री डॉ. अभय व डॉ. राणी बंग यांनी २००६ पासून युवा निर्मितीसाठी सुरू केलेल्या 'निर्माण' उपक्रमाच्या दहाव्या सत्रास लवकरच सुरुवात होत आहे. यासाठीची निवड प्रक्रिया नुक्तीच पूर्ण झाली असून देशभरातील २२७ युवांची शिबिरांसाठी निवड झाली आहे. यामध्ये १२२ युवती आणि १०५ युवकांचा सहभाग आहे. तब्बल १ हजार अर्जांमधून ही निवड करण्यात आली आहे.

२०१८-१९ पर्यंत निर्माणच्या ९ बॅचेस पार पडल्या असून महाराष्ट्रासह देशभरात विविध शैक्षणिक पार्श्वभूमीचे १२०० निर्माणी पसरलेले आहेत. त्यांच्यापैकी सुमारे ३५० जण कुठल्या ना कुठल्या सामाजिक प्रश्नावर काम करीत आहेत.

निर्माणचे दहावे सत्र लवकरच सुरू होत आहे. या सत्रासाठीच्या निवड प्रक्रियेत तब्बल १ हजार अर्ज निर्माणकडे आले होते. विविध पातळ्यांवर घेतलेल्या मुलाखतींमधून निर्माणच्या दहाव्या सत्रासाठी २२७ युवांची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या २२७ युवांना तीन शिबिरात विभागण्यात आले आहे. या सत्रातील पहिले शिबीर २७ डिसेंबर २०१९ ते ४ जानेवारी २०२० दरम्यान, दुसरे शिबीर ८ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत तर तिसरे शिबीर २९ फेब्रुवारी ते ७ मार्च या कालावधीत होत आहे. निर्माणच्या संकेतस्थळावर ही संपूर्ण यादी प्रकाशित करण्यात आली आहे. सोबतच आवश्यक त्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या सत्राच्या निमित्ताने निर्माण हा उपक्रम दहाव्या वर्षात प्रवेश करीत असल्याने याचे विशेष औचित्य आहे.

### प्रथमच 'निर्माण एक्स' प्रयोग

निर्माण शिक्षण प्रक्रिया प्रत्येकाच्या वैयक्तिक विकासावर लक्ष ठेवते. प्रत्येकाची काम करण्याची आवड, पद्धती आणि कल वेगळा असतो. निर्माण निवड प्रकियेदरम्यान ही बाब नेहमीच प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे असा वेगळा कल असलेल्या युवांना लक्षात घेत त्यांच्यासाठी 'निर्माण एक्स' नावाने वेगळा कृतीकार्यक्रम तयार करण्याचा प्रयोग प्रथमच निर्माण दशकपूर्तीच्या निमित्ताने केला जाणार आहे. यासाठी ९७ युवक युवती निवडले गेले आहेत.

### विविध क्षेत्रातील युवकांचा समावेश

१० व्या सत्रासाठी निवडलेल्या युवामध्ये मराठवाड्यातील २९, उत्तर महाराष्ट्रातील ३०, पश्चिम महाराष्ट्रातील २८, पूर्व विदर्भातील ३२, पश्चिम विदर्भातील ३०, मुंबईतील २५, पुण्यातील १५, कोकणातील १ याचबरोबर केरळ, कर्नाटक, गोवा, गुजरात, राजस्थान, पंजाब, हरयाणा, नवी दिल्ली, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, प. बंगाल या राज्यातीळ ३७ युवक- युवती या सत्रासाठी निवडण्यात आले. भारतातील नामांकित अशा एआयआयएमएस दिल्ली, रायपूर, ऋषिकेश, महाराष्ट्रातील २० शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, आयआयटी मुंबई, बनारस, इंदोर, दिल्ली, आयआयएसईआर पुणे, भोपाळ, तिरूपती या संस्थांसह राज्य व देशभरातील विविध नामांकित संस्थांमधील आरोग्य, अभियांत्रिकी, वकिली, समाजकार्य, पत्रकारिता, कला, वाणिज्य, विज्ञान, सांखिकी, सिनेमा नाट्य या क्षेत्रातील युवांचा यात समावेश आहे.

ePaper देशोन्नती Wed, 13 November 2019
https://deshonnati.digitaledition.in/c/45683775

सकाळ

# देशातील युवा करणार 'निर्माण दशकपूर्ती'

## सर्च संस्थेचा उपक्रम; २२७ युवांची शिबिरासाठी निवड

गडचिरोली, ता. १२ : सर्च संस्थेचे संस्थापक व संचालक पद्मश्री डॉ. अभय व डॉ. राणी बंग यांनी २००६ पासून युवा निर्मितीसाठी सुरू केलेल्या 'निर्माण' उपक्रमाच्या दहाव्या सत्रास लवकरच सुरुवात होत आहे. यासाठीची निवड प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली असून, देशभरातील २२७ युवांची शिबिरांसाठी निवड झाली आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील 'सर्च' येथे होणाऱ्या या शिबिरांदरम्यान युवांना त्यांची कौशल्ये व सामाजिक आव्हानांची सांगड घालून समृद्ध व समाधानी जीवन जगण्यास प्रवृत्त करणे हे निर्माण प्रक्रियेचे ध्येय आहे. या सत्रासाठीच्या निवड प्रक्रियेत तब्बल १ हजार अर्ज निर्माणकडे आले होते. विविध पातळ्यांवर घेतलेल्या मुलाखतींमधून निर्माणच्या दहाव्या सत्रासाठी २२७ युवांची निवड करण्यात आले आहे. यामध्ये मराठवाड्यातील २९, उत्तर महाराष्ट्रातील ३०, पश्चिम महाराष्ट्रातील २८, पूर्व विदर्भातील ३२, पश्चिम विदर्भातील ३०, मुंबईतील २५, पुण्यातील १५,



गडचिरोली : निर्माण शिबिरात सहभागी शिबिरार्थी.

कोकणातील १ याचबरोबर केरळ, कर्नाटक, गोवा, गुजरात, राजस्थान, पंजाब, हरियाना, नवी दिल्ली, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, पश्चिम बंगाल या राज्यांतील ३७ युवक-युवती या सत्रासाठी निवडण्यात आले आहेत.

भारतातील नामांकित अशा एआयआयएमएस दिल्ली, रायपूर, ऋषिकेश, तसेच महाराष्ट्रातील २० शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आयआयटी मुंबई, बनारस, इंदूर, दिल्ली, आयआयएसईआर पुणे, भोपाळ, तिरुपती या संस्थांसह राज्य व देशभरातील विविध नामांकित संस्थांमधील आरोग्य, अभियांत्रिकी, वकिली, समाजकार्य, पत्रकारिता, कला, वाणिज्य, विज्ञान, सांख्यिकी, सिनेमा, नाट्य या क्षेत्रांतील युवांचा यात समावेश आहे. निवड झालेल्या २२७ युवांना तीन शिबिरांत विभागण्यात आले आहे. या सत्रातील पहिले शिबिर २७ डिसेंबर २०१९ ते ४ जानेवारी २०२० दरम्यान, दुसरे शिबिर ८ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत तर तिसरे शिबिर २९ फेब्रुवारी ते ७ मार्च या कालावधीत होत आहे.

### प्रथमच 'निर्माण एक्स' प्रयोग

वेगळा कल असलेल्या युवांसाठी 'निर्माण एक्स' नावाने वेगळा कृती कार्यक्रम प्रथमच निर्माण केला जाणार आहे.